# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१९

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

### सटाणा नगरपरिषदेचा (जि.नाशिक) पंतप्रधान आवास योजनेत समावेश करण्याबाबत

**(१) ९५०५० (३०-१२-२०१७). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सटाणा नगरपरिषदेचा (जि. नाशिक) पंतप्रधान आवास योजनेत समावेश माहे ऑक्टोबर, २०१७ च्या तिसऱ्या आठवड्यात केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सटाणा नगरपरिषद हद्दीत पूर्णक्षमतेने पंतप्रधान आवास योजना राबविण्यारिकता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (११-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) प्रधानमंत्री आवास योजना (नागरी) अंतर्गत नाशिक जिल्ह्यातील सटाणा शहराकरिता सटाणा नगरपरिषदेमार्फत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील लाभार्थ्यांव्दारे वैयक्तिक स्वरुपातील घरकुल बांधण्यास अनुदान (BLC) या घटकांतर्गत ५८ लाभार्थ्यांचे सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) दि.२९.१०.२०१८ रोजी राज्य सुकाणू अभिकरणास (म्हाडा) प्राप्त झालेले आहेत. सदर प्रस्तावांची म्हाडा मार्फत छाननी करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### दक्षिण मुंबईतील धोकादायक इमारतीतील रहिवाश्यांसाठी संक्रमण शिबिरे उभारण्याबाबत

**(२) १०३३४१ (१२-०२-२०१८). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण मुंबईत सद्यस्थितीत अनेक धोकादायक इमारती असून सदरहू इमारतीतील रहिवाश्यांसाठी नजीकच्या परिसरात संक्रमण शिबिरे उपलब्ध नसल्याने हे रहिवाशी दूरच्या ठिकाणच्या संक्रमण शिबिरात जाण्यास नकार देत असून धोकादायक इमारतीतच राहत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ च्या अंतिम आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दक्षिण मुंबईतील धोकादायक इमारतीतील रहिवाश्यांसाठी नजीकच्या परिसरात संक्रमण शिबिरे उभारण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०५-०२-२०१९) :** (१) होय.
(२) व (३) म्हाडा प्राधिकरणाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार मुंबई शहर विभागांतर्गत दक्षिण मुंबई क्षेत्रात ३७२४ शिबिर सदनिका बांधण्यात आल्या आहेत व १८७५ संक्रमण शिबीर सदनिकांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे

---

## मुंबईतील जुन्या इमारतीमधील रहिवाशांच्या "स्वयं पुनर्विकासासाठी एक खिडकी योजना सुरु करण्याबाबत

**(३) १०७१४५ (०३-०४-२०१८). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.संजय पोतनीस (कलिना), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील हजारो जुन्या इमारतीमधील लाखो रहिवाशांच्या "स्वयं पुनर्विकासासाठी एक खिडकी योजना" शासनाने आखली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेचे स्वरुप व निकष काय आहेत, तसेच सदर निर्णयाची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे,
(३) असल्यास, सदर योजना नाशिक शहरासाठीही सुरु करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०८-०२-२०१९) :** (१) होय. मुंबईतील म्हाडा वसाहतीमधील इमारतींचा पुनर्विकास विकास नियंत्रण नियमावली ३३ (५) अंतर्गत सहकारी गृहनिर्माण संस्थांनी स्वयं पुनर्विकास करण्यास प्रोत्साहन मिळण्याकरीता म्हाडाच्या मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळांतर्गत स्वतंत्र कक्षाची निर्मिती करण्यात आली आहे.

(२) सदर कक्षामार्फत सहकारी गृहनिर्माण संस्थेचे पदाधिकारी/सभासद यांना स्वयं पुनर्विकासाबाबत मार्गदर्शन करण्यात येत आहे. तसेच सदर कक्ष संस्थांच्या स्वयं पुनर्विकासाबाबतच्या प्रस्तावावर जलद गतीने कार्यवाही करण्याकरीता समन्वयाचे कार्य करत आहे.
(३) नाशिक मंडळाच्या अखत्यारीतील वसाहतींच्या रहिवाशांकडुन स्वयंपुनर्विकास होणेबाबत अद्याप कोणताही प्रस्ताव प्राप्त झालेला नाही. प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर मुंबई मंडळाप्रमाणेच नाशिक मंडळास योजना सुरु करण्याबाबत विचार करण्यात येईल, असे म्हाडाने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील कुर्ला (पश्चिम) येथील किनारा हॉटेल ला लागलेल्या आगीचा प्राप्त झालेला अहवाल

**(४) १११२४८ (०७-०४-२०१८). अॅड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील कुर्ला (पश्चिम) येथील किनारा हॉटेल ला दिनांक १६ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास लागलेल्या भीषण आगीमध्ये आठ जणांचा झालेल्या मृत्युबाबत चौकशी समितीचा अहवाल अडीच वर्षानंतर प्राप्त झाला असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अहवालानुसार उपहारगृहातील आग एचपीसीएल कंपनीच्या एलपीजी सिलेंडरच्या सदोष मेन व्हॉलमुळे तसेच रेग्युलेटरमधून गॅस गळती होत असल्यामुळे लागली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, सदर चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार राज्यातील सर्वच उपहारगृहातील व रस्त्यावर अनधिकृतपणे सिलेंडरचा वापर करुन खाद्यपदार्थ बनविणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१९) :** (१) कुर्ला (पश्चिम) येथील किनारा हॉटेलला दिनांक १६ ऑक्टोबर, २०१५ रोजी लागलेल्या आगीमध्ये आठ जणांचा मृत्यू झाला ही वस्तुस्थिती आहे.
सदर प्रकरणाचा चौकशी अहवाल माहे जानेवारी, २०१७ मध्ये प्राप्त झाला असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.
(२), (३) व (४) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आली असून, एचपीसीएल कंपनीच्या गॅस सिलेंडरच्या मुख्य जोडणीमधून गॅसची गळती होऊन एल.पी. गॅस जमा झाला व तो अज्ञात ठिणगीच्या संपर्कात आल्याबाबतचे अभिप्राय बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागामार्फत देण्यात आले आहेत.

सदर प्रकरणी एचपीसीएल कंपनीच्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द तसेच संबंधित गॅस एजन्सीविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत महानगरपालिकेमार्फत एचपीसीएल कंपनीस दिनांक ०१.१२.२०१५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले असून, त्याअनुषंगाने विनोबा भावे नगर पोलीस ठाणे, कुर्ला येथे एफ.आय.आर. दाखल करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेल्या चौकशीत खालील अनियमितता आढळून आल्या आहेत:-

• संबंधित स्वच्छता निरीक्षकांनी दर ३ महिन्यातून एकदा आस्थापनेची पाहणी करणे आवश्यक असतांना ती केली नाही.

• सदर आस्थापनेत गॅस सिलेंडर चुकीच्या जागेत (पोटमजल्याच्या बाल्कनीमध्ये) ठेवल्याबाबत आक्षेप घेतला नाही व पोटमजल्याचा वापर स्टोअर रुमऐवजी सर्व्हिस रुम म्हणून करत असल्याबाबत निरीक्षण अहवालामध्ये उल्लेख केला नाही.

• पोटमाळयाचे पोटमजल्यामध्ये अनधिकृतपणे रुपांतर केल्याबाबत हॉटेलचालकाविरुध्द कोणतीही कारवाई केली नाही.

सदर अनियमिततांच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली/येत आहे:-

• एल विभागातील दोन स्वच्छता निरीक्षक आणि इमारत व कारखाने विभागातील कनिष्ठ अभियंता व मुकादम यांना निलंबित करुन त्यांचेविरुध्द खात्यांतर्गत चौकशी करण्यात आली.

• सदर चौकशीअंती दोषसिध्दी झालेल्या दोन्ही स्वच्छता निरीक्षकांवर माहे एप्रिल २०१७ मध्ये दंडात्मक कारवाई करण्यात आली व त्यांचा निलंबन कालावधी अक्षमापित करण्यात आला.

• मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३९४ अन्वये एकूण २२०८ आस्थापनांचे निरीक्षण करुन, १९८५ तपासणी अहवाल देण्यात आले आहेत.

• तसेच ११२ न्यायालयीन खटले दाखल करण्यात येऊन, ४५२ आस्थापनांवर जप्तीची कारवाई करण्यात आली.

• १ आस्थापनेवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली असून, ५०३ गॅस सिलेंडर जप्त करण्यात आले.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**म्हाडाच्या पुणे मंडळाने दिलेल्या भूखंडांवरील संस्थांनी भुईभाडे भरले नसल्याबाबत**

**(५) १११६०४ (०३-०४-२०१८). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडाच्या पुणे मंडळाने दिलेल्या भूखंडांवर गृहनिर्माण संस्था, शाळा आणि कार्यालये उभारण्यात आली असून अशा अनेक संस्थांनी भुईभाडे भरले नसल्याने म्हाडाची कोट्यवधींची रक्कम थकीत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त संस्थांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१२-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.

पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाअंतर्गत भूखंड वाटपाचे वेळेस भांडवलीकरण करुन व सहकारी गृहनिर्माण संस्थेचे अभिहस्तांतरण करताना ३० वर्षाचे भुईभाडे आगाऊ वसूल करण्यात आले. सद्यस्थितीत मंडळाकडे एप्रिल,२०१७ ते मार्च,२०१८ पर्यंत भुईभाडेची मागणी रु.५२.३१ लक्ष एवढी होती. त्यापैकी मंडळाने जानेवारी,२०१८ अखेर रु.४१.४८ लक्ष एवढे वसुल केलेले आहे. तसेच, मार्च,२०१८ अखेर रु.५१.६० लक्ष एवढी वसूली केलेली आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेतील अत्यावश्यक सेवेतील अग्निशमन कर्मचारी व बेस्ट उपकमातील ५ हजार कर्मचा-यांना ग्रॅच्युटी, भविष्य निर्वाह निधी, रजेचा पगार व पेन्शन गत २ वर्षापासून मिळाली नसल्याबाबत**

**(६) ११७९४३ (२३-०७-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेतील अत्यावश्यक सेवेतील अग्निशमन कर्मचारी व बेस्ट उपकमातील ५ हजार कर्मचा-यांना ग्रॅज्युइटी, भविष्य निर्वाह निधी, रजेचा पगार व पेन्शन गत २ वर्षापासून मिळाली नसून यासाठी मा.मुख्यमंत्री , प्रधान सचिव, नगरविकास व महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे दिनांक २२ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास वारंवार मागणी केली असुन जोपर्यत कर्मचा-यांची देणी देत नाहीत तोपर्यत निवासस्थाने सोडण्यात येउु नयेत असे आदेश महानगरपालिकेने व बेस्ट प्रशासनाने दिनांक २१ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास काढले आहेत, हे खरे आहे काय काय,
(२) असल्यास, कर्मचा-यांना त्यांची देय रक्कम तातडीने देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०१-२०१९) :** (१) असे आदेश आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दिली नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.
(२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील अत्यावश्यक सेवेतील अग्निशमन दलातील अधिकारी/कर्मचारी यांना प्रतिवर्षी देण्यात येणाऱ्या गणवेशाच्या अनुषंगाने सन २०११ च्या

गणवेश प्रकरणात अधिकारी/कर्मचारी यांची चौकशी प्रकरणे प्रलंबित असल्यामुळे, त्यांचे अंशराशीकरण, उपदान व शिल्लक रजेचे वेतन रोखून ठेवण्यात येत होते.

तथापि सदर चौकशी प्रकरण हे सार्वत्रिक व सदर प्रकरणाची तीव्रता लक्षात घेऊन विशेष बाब म्हणून कर्मचाऱ्यांचे रोखण्यात आलेले उपदान व शिल्लक रजेचे वेतन ठोक रुपये २०,०००/- इतकी रक्कम प्रत्येक चौकशीच्या अंतिम निर्णयासापेक्ष रोखून उर्वरित रकमेचे अधिदान करण्यात आल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

बेस्ट उपक्रमातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना त्यांची देय रक्कम देण्याच्या दृष्टीने बेस्ट प्रशासनामार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली/येत आहे:-

• सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना त्यांच्या ९०% भविष्य निर्वाह निधी रकमेचे प्रदान सेवा समाप्तीनंतर दुसऱ्या कामकाजादिवशी ई.सी.एस. द्वारे करण्यात येते. तसेच, उर्वरित १०% निर्वाह निधी रकमेचे प्रदान कामकाजाच्या वीस दिवसांत करण्यात येते.

• सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे निवृत्ती वेतन अर्ज त्यांच्याकडून प्राप्त झाल्यानंतर आवश्यक कागदपत्रांसहित आयुक्त, क्षेत्रीय भविष्य निर्वाह निधी, वांद्रे येथील कार्यालयात निवृत्तीवेतन दावा निपटारा करण्याकरिता पाठविण्यात येतात.

सबब बेस्ट उपक्रमातील सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधी व निवृत्ती वेतनाचे दावे प्रलंबित नसल्याचे बेस्ट प्रशासनामार्फत कळविण्यात आले आहे.

• माहे नोव्हेंबर, २०१८ पासून बेस्ट प्रशासनाने निधी उपलब्धतेनुसार निवृत्त कर्मचाऱ्यांना त्यांच्या देय असलेल्या उपदानाच्या रकमेच्या एक तृतीयांश रक्कम देण्यास सुरुवात केली आहे.

• जे सेवानिवृत्त कर्मचारी वैद्यकीय उपचाराकरिता अथवा त्यांच्या मुलांच्या लग्नाकरिता उपदानाच्या देय रकमेमधून मदत मिळावी म्हणून अर्ज करीत आहेत अशा कर्मचाऱ्यांना त्यांच्या उपदानाच्या देय रकमेमधून प्रत्येकी रु. २ लाख इतकी रक्कम प्रदान करण्यात येतात.

---

**सावदा नगरपरिषद हद्दीत मिनी हायमास्ट इलेक्ट्रीक पोल उभारण्याचे काम ईईएसएल योजनेतंर्गत करुन मिळणेबाबत**

**(७) १२४५३४ (२७-०७-२०१८). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावदा नगरपरिषदेच्या हद्दीत जुने पारंपारिक पद्धतीचे पथदिवे बदलून नवीन पध्दतीचे एलईडी पथदिवे बसविणे व मिनी हायमास्ट इलेक्ट्रीक पोल उभारणे इ. कामे ईईएसएल योजनेअंतर्गत करुन मिळणेबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक २६ फेब्रुवारी, २०१८ व दिनांक ६ मार्च, २०१८ निवेदनाव्दारे मा.मुख्यमंत्री यांच्याकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवीन पध्दतीचे एलईडी पथदिवे व मिनी हायमास्ट इलेक्ट्रीक पोल उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०२-२०१९) :** (१) अशा आशयाचे निवेदन प्राप्त झाले आहे, हे खरे आहे.

(२) सावदा नगरपरिषदेने दि.२६.०६.२०१८ रोजी ईईएसएल कंपनीसोबत एल.ई.डी. पथदिव्यांबाबत करार केलेला असून, ईईएसएल कंपनीने शहरात सर्वेक्षणाचे काम पुर्ण करुन एल.ई.डी. लाईट लावण्याचे काम सुरु झाले आहे, असा जिल्हाधिकारी, जळगाव यांनी अहवाल सादर केला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरातील डीपीसी अंतर्गत विकासकामे प्रलंबित असल्याबाबत**

**(८) १२६३९८ (२९-०७-२०१८). प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील विकासकामे करण्यासाठी शासनाकडून (डीपीसी) निधी मंजूर केला जात असल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्ते, फूटपाथ तयार करणे, समाजमंदिर बंधने, व्यायामशाळा बांधणे, व्यायामशाळांसाठी साहित्य, सार्वजनिक वाचनालय, उद्यानांचा विकास करणे आदी विकासकामाला निधी मंजूर करण्यापूर्वी संबधित विभागाकडून अभिप्राय किंवा ना हरकत प्रमाणपत्र (NOC)घेतले जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे महानगरपालिकेच्या अधिकारी अभिप्राय किंवा ना हरकत प्रमाणपत्र वेळेत देत नसल्यामुळे विकासकामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार कामामध्ये विलंब करणाऱ्या संबधित दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४)

• पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात विकास कामे करतांना शासनाकडून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करून महापालिकेच्या संबंधित यंत्रणेकडून कार्यवाही केली जाते.

• पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत विकास कामे अन्य यंत्रणा यांचेकडून राबवितांना प्रस्तावीत कामांच्या जागेच्या मालकीहक्काची खातरजमा करणे, विकास आराखड्याशी सुसंगतता तपासणी यासाठी पुणे महानगरपालिकेचे संबंधित खात्याची ना हरकत प्रमाणपत्र /अभिप्राय घेणे क्रमप्राप्त ठरते.

• या सर्व बाबींमुळे तसेच अन्य विभागांशी समन्वय साधणे आवश्यक असल्यामुळे विलंब लागू शकतो.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांताक्रुझ येथील वाकोला शिवाजी नगर रोड येथे मिठी नदीवर असलेल्या पुलाची अत्यंत दुरवस्था झाल्याबाबत**

**(९) १२६४३३ (०४-१२-२०१८). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांताक्रुझ येथील वाकोला शिवाजी नगर रोड येथे मिठी नदीवर असलेल्या पुलाची अत्यंत दुरवस्था झाल्याचे नुकतेच माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त पुलावरुन वाहनांची व पादचा-यांची ये-जा असल्याने तसेच दोन्ही बाजुने संरक्षण कठडे तुटलेले असल्याने कोणत्याही क्षणी पुल कोसळून गंभीर दुर्घटना घडण्याची शक्यता वर्तविली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त पुलाच्या रुंदीकरणाचे आणि पुर्नबांधणी कामासंदर्भात शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१९) :** (१) सदर पूल वाकोला नदीवरील जलवाहिन्यांच्या देखभालीसाठी असलेल्या रस्त्यावर असून, बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेल्या सर्वेक्षणात सदर पुलाची अवस्था खराब झाल्याचे आढळून आले आहे.
(२) सदर पुलावरुन वाहनांची वाहतुक बंद करण्याबाबत वरिष्ठ वाहतुक पोलीस निरीक्षक यांना दिनांक १७.०१.२०१९ रोजी कळविण्यात आल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) व (४) सदर पुलाच्या पुनर्बांधणीकरिता महानगरपालिकेमार्फत नेमणुक करण्यात आलेल्या सल्लागाराकडून सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले असून, आराखडा तयार करण्यात येत आहे.
तसेच, सदर पुलाच्या पुनर्बांधणीची निविदा प्रक्रिया लवकरच सुरु करण्यात येणार असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

---

**अग्निशमन दलातील अप्रशिक्षित कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देवून सक्षम करण्याबाबत**

**(१०) १२६४४१ (०४-१२-२०१८). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील

गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कमला मिल आणि इतरत्र होणाऱ्या आगीच्या घटना टाळण्याच्या दृष्टीने अग्निसुरक्षेच्या ३४ अग्निशमन अधिकाऱ्यांचे पथक नेमण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अग्निशमन क्षेत्रातील केवळ सहा महिन्याचा कोर्स केलेल्या अधिकाऱ्यांना महाराष्ट्र अग्निसुरक्षा नियम, २००६ नुसार अग्निसुरक्षा तपासणी करण्याचे अधिकार नसल्याची धक्कादायक माहिती पुढे आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०२-२०१९) :** (१) मुंबईतील कमला मिल व इतरत्र होणाऱ्या आगीच्या घटना टाळण्याच्या दृष्टीने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या इतर विभागातील संबंधित अधिकारी व अग्निशमन दलातील २४ अधिकारी मिळून अग्निसुरक्षा पालन कक्ष तयार करण्यात आला आहे.

(२) व (३) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ च्या तरतुदीनुसार सदर अधिकाऱ्यांना संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय यांचा नामनिर्देशित पाठयक्रम पूर्ण करणे आवश्यक आहे.

तथापि, मुंबई अग्निशमन दलातील अधिकारी यांनी संचालक, राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर यांचा “कैंद्र अधिकारी व निदेशक” हा पाठयक्रम पूर्ण केला असून, सदर पाठयक्रम हा नामनिर्देशित पाठयक्रमापेक्षा उच्च दर्जाचा असल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जोगेश्वरी (मुंबई) येथे मनोरंजन मैदान, रुग्णालय आणि रस्त्यासाठी आरक्षित असणाऱ्या भूखंडाच्या गैरव्यवहाराबाबत

**(११) १२६४७६ (०५-१२-२०१८). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जोगेश्वरीमध्ये मनोरंजन मैदान, रुग्णालय आणि रस्त्यासाठी आरक्षित असणाऱ्या ५०० कोटींच्या भूखंडाच्या गैरव्यवहाराप्रकरणी मुंबई महानगरपालिकेच्या विकास नियोजन विभागातील नऊ तर विधी खात्यातील पाच अशा एकूण १८ जणांवर ठपका ठेवण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकास नियोजन विभागातील कार्यकारी अभियंता, सहाय्यक अभियंता, दुय्यम अभियंता यांच्यासह विधी खात्यातील कायदा उपअधिका-यावर निलंबनाची कारवाई करण्यात

आल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उर्वरित १४ जणांची विभागीय चौकशी करण्याचे आदेश आयुक्तांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी विभागीय चौकशी पूर्ण झाली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार दोषींविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०२-२०१९) :** (१) उपायुक्त (विशेष), बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी सादर केलेल्या अहवालाच्या आधारे, सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विकास नियोजन विभागातील १७ व विधी विभागातील ६ असे एकूण २३ अधिकारी/कर्मचारी सकृतदर्शनी जबाबदार असल्याचे आढळून आले आहे.

(२) सदर प्रकरणी विकास नियोजन विभागातील १ कार्यकारी अभियंता, १ सहाय्यक अभियंता, १ दुय्यम अभियंता यांच्यासह विधी विभागामधील १ उप कायदा अधिकारी यांना दिनांक २१.०८.२०१८ रोजी निलंबित करण्यात आल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(३), (४) व (५) सदर प्रकरणी सकृतदर्शनी जबाबदार असलेल्या विकास नियोजन विभागातील १७ व विधी विभागातील ६ अशा एकूण २३ अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द खात्यांतर्गत सर्वंकष/संक्षिप्त चौकशीची कार्यवाही करण्याचे आदेश आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दिले आहेत.

सदर खात्यांतर्गत सर्वंकष/संक्षिप्त चौकशी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, त्याअनुषंगाने निदर्शनास येणाऱ्या दोषसिध्दीच्या प्रमाणानुसार संबंधितांविरुध्द योग्य त्या शिक्षेची कारवाई करण्यात येणार असल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

---

### मुंबई शहर व उपनगरातील झोपडपट्टी पुनर्वसन योजनांना मंजूरी देण्याबाबत

**(१२) १२६४८५ (०४-१२-२०१८). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई झोपडपट्टीमुक्त करण्याचे प्रयत्न २२ वर्षापूर्वी सुरु करण्यात आल्यानंतरही केवळ १.५० लाख झोपडपट्टी वासियांचे पुनर्वसन होऊ शकले असून झोपडपट्टी पुनर्वसन योजना नियमावली बनविताना अडचणी दूर करण्याचा प्रयत्न केला जात नसल्याने मुंबईतील ६५ लाख झोपडपट्टीवासीयांच्या पुनर्वसनाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाशी संबंधित अधिकारी तसेच या योजनेतील विकासक, वास्तुरचनाकार आदींशी सल्लामसलत करून सुधारित झोपडपट्टी पुनर्वसन योजना नियमावली तयार करणे अपेक्षित असतानाही त्याकडे दुर्लक्ष झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई शहर व उपनगरातील किती झोपडपट्टी पुनर्वसन योजनांना मंजूरी देण्यात आली आहे,
(४) असल्यास, त्यापैकी किती झोपडपट्टी योजनांची कामे अद्याप सुरु झालेली नाहीत,
(५) असल्यास, त्याची कारणे काय आहेत व प्रलंबित असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प योजनेबाबत जबाबदार असणाऱ्या विकासकांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०८-०२-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही.

मुंबई शहरातील झोपडपट्टयांचा विकास करणेकरिता शासनाकडून मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे गठन केलेले आहे. सदर प्राधिकरणातर्फे महाराष्ट्र झोपडपट्टी अधिनियम, १९७१ अन्वये व बृहन्मुंबई करिता सुधारीत विकास नियंत्रण नियमावलीच्या नियम ३३(१०) नुसार झोपडपट्टयांच्या पुनर्वसनाकरिता सन १९९६ पासून परवानग्या देण्यात येतात.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये येणाऱ्या अडचणी विचारात घेऊन शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व.पु.) अधिनियम, १९७१ मध्ये सुधारणा केली असून त्याबाबत दि.२६.०४.२०१८ रोजी सदर सुधारणा अधिसूचित केली आहे. अधिनियमांतील सदर सुधारणांच्या अनुषंगाने तसेच बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली २०१४-२०३४ मध्ये करण्यात आलेल्या सुधारणांच्या अनुषंगाने झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसाठी नव्याने नियमावली (३B) करण्याचे काम झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे व गृहनिर्माण विभागाकडे सुरु आहे. सदर सुधारणा करताना वास्तुरचनाकार/ विकासक व अधिकारी यांच्याशी वेळोवेळी सल्लामसलत करण्यात येत आहे.

तसेच झो.पु. योजना राबविताना येणाऱ्या अडचणी प्राधिकरणातर्फे विकासकासोबत संयुक्त बैठक घेऊन सोडविण्यात येतात.

(३) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून १५६२ योजनांना मंजूरी देण्यात आलेली असून, सदर योजनांमध्ये ५०१२९१ झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन प्रस्तावित केलेले आहेत. तसेच १,९९,७३७ सदनिका करीता भोगवटा प्रमाणपत्र मंजूर केलेले आहेत, असा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.

(४) आजमितीस ४३२ योजनांची कामे प्रलंबित असल्याचा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.

(५) CRZ ची बांधने, प्रतिबंधीत/ नाविकास क्षेत्राचा समावेश असल्याने काही योजना कार्यान्वयीन होऊ शकलेल्या नाहीत. याशिवाय झोपडीधारकांच्या संस्थांचे असहकार्य, न्यायालयीन प्रकरणे, विकासकांची आर्थिक सक्षमता, अपात्र/संरक्षित झोपडीधारकांकडून झोपड्यांच्या निष्कासनास विरोध अशा बाबींमुळे झोपडपट्टी पुनर्वसन योजना प्रलंबित राहतात.

विहित कालावधीत झोपडपट्टी पुनर्वसन योजना पूर्ण न केलेल्या विकासकांच्या

विरुध्द कलम १३(२) अंतर्गत कारवाई करण्यात येते. ५८ योजना संदर्भात अशी कारवाई करण्यात आली असून नवीन विकासक नियुक्त करण्याची मूभा संबंधित संस्थांना देण्यात आली आहे असा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने (म्हाडा) मुंबईतील गृहनिर्माण संस्थांमधील घरांच्या पुनर्विकासाच्या प्रस्तावास मंजूरी देण्याबाबत**

**(१३) १२६४९४ (०४-१२-२०१८). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विकास आराखड्याला शासनाने मंजूरी दिल्यामुळे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने (म्हाडा) मुंबईतील किती हजार गृहनिर्माण संस्थांमधील घरांच्या पुनर्विकासाचे प्रस्ताव मंजूर केले आहेत,

(२) असल्यास, म्हाडा वसाहतींच्या विकासासाठी विकासकांनी गृहसाठा (हौऊसिंग स्टॉक) देण्याचे धोरण रद्द केले आहे काय,

(३) असल्यास, विकासकांनी गृहसाठा देण्याचे धोरण रद्द करण्यात आल्याने त्याऐवजी कोणती नव्याने तरदूत केली आहे,

(४) असल्यास, उक्त निर्णयाच्या अनुषंगाने अंमलबजावणीची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. प्रकाश महेता (०८-०२-२०१९) :** (१) शासनाच्या वि.नि.नि. ३३(५) दि. ०८.१०.२०१३ व दि. ०३.०७.२०१७ च्या फेरबदलाच्या अधिसूचनेनुसार ९८ सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या पुनर्विकासाचे प्रस्ताव प्राप्त झाले असून यापैकी ४५ सहकारी गृहनिर्माण संस्थांना अधिमुल्य आकारुन मंजुरी देण्यात आली असून ४ सहकारी गृहनिर्माण संस्थांना गृहसाठा हिस्सेदारी पध्दतीने मंजुरी देण्यात आल्या आहेत.

(२) हे खरे नाही. म्हाडा वसाहतीमधील सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या पुनर्विकासाकरीता वि.नि.नि. ३३(५) अन्वये अधिमुल्य आकारुन किंवा गृहसाठा (हौसिंग स्टॉक) देण्याचा पर्याय संस्थेस उपलब्ध आहे.

(३) पुनर्विकासाकरीता सहकारी गृहनिर्माण संस्थेस अधिमुल्य आकारुन किंवा गृहसाठा (हौसिंग स्टॉक) देण्याचे दोन्ही पर्याप उपलब्ध आहेत.

(४) सहकारी गृहनिर्माण संस्थांचे पुनर्विकासाचे प्रस्ताव म्हाडाकडे प्राप्त होत असून वि.नि.नि. ३३(५) अन्वये पुनर्विकासाकरीता सहकारी गृहनिर्माण संस्थांकडून चांगला प्रतिसाद आहे, असे मुंबई मंडळ, म्हाडाने कळविले आहे.

---

### म्हाडास विशेष प्राधिकरणाचा दर्जा देण्यात आल्याबाबत

**(१४) १२६५२४ (०४-१२-२०१८). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने म्हाडास विशेष प्राधिकरणाचा दर्जा दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विशेष प्राधिकरणाचा दर्जा दिल्यानंतर म्हाडाने ३२ जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाच्या प्रस्तावास माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, म्हाडाकडे पुनर्विकासाचे एकुण किती प्रस्ताव मंजूरीसाठी आले आहेत व उर्वरित प्रस्ताव मंजूरीविना प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उर्वरित प्रस्तावास मंजूरी देण्याच्या अनुषंगाने कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. प्रकाश महेता (०२-०२-२०१९) :** (१) होय.

(२) म्हाडास नियोजन प्राधिकरणाचे अधिकार प्राप्त झाल्यावर ऑगस्ट, २०१८ पर्यंत एकंदर ९० प्रकल्पांच्या प्रस्तावांना मंजूरी देण्यात आली आहे.

(३) व (४) म्हाडा अभिन्यासातील पुनर्विकासाशी संबंधित सुमारे २०० प्रकल्पांचे विविध प्रस्ताव प्राप्त झाले असून त्यापैकी १६० प्रकल्पांना मंजूरी देण्यात आली आहे. उर्वरित प्रस्तावांची छाननी विविध स्तरावर सुरु असून अनेक प्रस्तावांमध्ये कागदपत्रांची पूर्तता होणे, देय रकमेचा भरणा करणे या बाबी प्रलंबित असल्यामुळे मंजूरी देता येऊ शकली नाही. कागदपत्रांची पुर्तता व आवश्यक त्या रक्कमेचा भरणा झाल्यावर उर्वरित प्रस्तावांना मंजूरी देण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

---

### मुंबई महानगरपालिकेतील मराठी शाळातील पटसंख्या वाढविण्याबाबत

**(१५) १२६५६९ (०५-१२-२०१८). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील महानगरपालिका शाळांमधील विद्यार्थ्यांची पटसंख्या दरवर्षी घसरत असल्याने पाच वर्षात ५० शाळा बंद करण्यात आल्या असून यापैकी ३५ शाळा खाजगी शिक्षण संस्थांना चालविण्यासाठी देण्यात येणार असल्याचा निर्णय माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठी शाळांच्या विलीनीकरणाचा प्रस्ताव आणून आर-दक्षिण विभाग, महात्मा

गांधी मराठी शाळा, पी-दक्षिण उन्नत मराठी शाळा, के-पश्चिम मुद्रण कामगार मराठी शाळा, एम-पश्चिम येथील डी.एन.नगर मराठी शाळा, एच-पश्चिम येथील वांद्रे पेटीट मराठी शाळा या मराठी शाळांमधील विद्यार्थ्यांची पटसंख्या पाच वर्षात शून्यावर आली तर याच मराठी शाळांबरोबर उर्दू, तेलगू, गुजरातील या शाळांमधील विद्यार्थ्यांचे भविष्यही अंधारात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पटसंख्याच्या कारणास्तव वरील शाळा विलीनीकरणाचा प्रस्ताव शिक्षण समितीच्या मंजुरीसाठी दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार मराठी शाळांचे विलिनीकरण होऊ नये तसेच मराठी शाळेतील पटसंख्या वाढविण्यासाठी दर्जेदार शिक्षण देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०२-२०१९) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पटसंख्या शून्य झालेल्या मराठी शाळांच्या विलीनकरणाच्या ठरावास दिनांक २७.०९.२०१८ रोजी शिक्षण समितीची कार्योत्तर मंजुरी मिळाल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(२) सदर शाळा जवळच्या शाळेत विलीन झाल्या आहेत. त्यामुळे त्या शाळांमधील विद्यार्थी विलीन झालेल्या शाळांमधून शिक्षण घेत असल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(३) विद्यार्थ्यांची पटसंख्या ३० पेक्षा कमी झाल्याने विलीनीकरणाचा प्रस्ताव शिक्षण समितीच्या मंजुरीकरिता सादर करण्यात आला आहे.

(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थी पटसंख्या वाढविण्यासाठी महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या/येत आहेत:-

• प्रत्येक मनपा शाळेतील शिक्षक पट नोंदणी पंधरवडयात घरोघरी जाऊन सर्व माध्यमातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांना दाखल करण्यास नियोजित प्रयत्न करतात.

• पालक सभांमध्ये/शाळा व्यवस्थापन समिती सभांमध्ये मातृभाषेतून शिक्षण घेण्यास प्रवृत्त केले जाते.

• पालकांचा इंग्रजी माध्यमाकडे वाढलेला कल लक्षात घेता, मराठी माध्यमाच्या शाळांमधून सेमी इंग्रजी अध्यापन सुरु करण्यात आले आहे.

• महानगरपालिका शाळांमधील विद्यार्थ्यांची गळती थांबविण्यासाठी शैक्षणिक साहित्य, वह्या इत्यादी २७ वस्तूंचे मोफत वाटप, विद्यार्थीनींना उपस्थिती भत्ता (मुदतठेव), विद्यार्थ्यांना मोफत बस प्रवास, मोफत पाठयपुस्तके, शालेय आरोग्य कार्यक्रम इत्यादी तसेच शासनाने निर्देशित केलेले उपक्रम, शालेय पोषण आहार, संगणक प्रशिक्षण, शाळा व्यवस्थापन समितीमार्फत जनजागृती राबविण्यात येत आहे.

• मनपा शाळांचा दर्जा उंचावण्यासाठी व्हर्च्युअल क्लासरुम, शाळा सुधार प्रकल्प, शाळांतील वाचनालये, शालेय इमारतींची दुरुस्ती, दर्जोन्नती व पुनर्बांधणी, प्राथमिक शिक्षक प्रशिक्षण केंद्र

यांसारख्या उपाययोजना सुरु करण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईमध्ये मोठ्या प्रमाणात सांडपाणी विना प्रक्रिया समुद्रात सोडले जात असल्याबाबत**

**(१६) १२६६५२ (०५-१२-२०१८). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :**
(१) मुंबईमध्ये मोठ्या प्रमाणात समुद्रात कचरा फेकला जात असून विना प्रक्रिया सांडपाणीही सोडले जात आहे हे गंभीर असून मुंबई महानगरपालिका व शासनाला उक्त प्रकरणी कार्यवाही करावी लागेल असे न्यायालयाने स्पष्ट केल्याचे माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अभ्यास अहवालानुसार दररोज मुंबईतील २ हजार ६७१ दशलक्ष लिटर सांडपाण्यापैकी २ हजार १६ दशलक्ष लिटर सांडपाण्यावर प्रक्रिया केली जाते व उर्वरित ६५५ दशलक्ष लिटर सांडपाणी योग्य प्रक्रियेविनाच समुद्रात सोडले जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मरिन ड्राईव्हवर लाटांबरोबर आलेली घाण व कचरा पाहता समुद्राच्या प्रदुषणाला प्रतिबंध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१९) :** (१) सदर प्रकरणी सिटीजन सर्कल फॉर सोशल वेल्फेअर ॲण्ड एज्युकेशन यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका क्रमांक ३/२०१८ सादर केली असून, सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(२) नाल्यालगत अस्तित्वात असलेल्या झोपडपट्टीतून निर्माण होणारे सांडपाणी नाल्यावाटे समुद्रात प्रवाहित होते.

सदर सांडपाणी मलनि:सारण वाहिन्यांमध्ये वळविण्याचे प्रस्तावित करण्यासाठी महानगरपालिकेने वेगवेगळया सल्लागारांची नेमणुक केली असल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.
(३) व (४) समुद्राच्या प्रदुषणाला प्रतिबंध करण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली/येत आहे:-
• महानगरपालिकेच्या “सी” विभागातील मरिन ड्राईव्हवर लाटांबरोबर आलेली घाण व जुलै महिन्यामध्ये समुद्रातील भरतीच्या वेळेत वाहून फुटपाथ व रस्त्यावर जमा झालेला आलेला कचरा मनुष्यबळ व वाहनांची व्यवस्था करुन उचलण्यात आला आहे.
• भरतीच्या वेळेत समुद्रतटावरील जमा होणारा कचरा गोळा करुन त्याची रोज विल्हेवाट लावण्यात येते.

• मुंबईतील ९ चौपाट्यांवर स्वच्छतेच्या सेवा अविरत पुरविण्यात येतात.
• नाल्यातून समुद्रात कचरा न जाण्यासाठी फ्लोटींग बुम बसविण्यात आले आहेत.

---

**कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेच्या संजयनगर येथील डम्पिंग ग्राउंडमुळे परिसरात डेंग्यूचे अनेक रुग्ण आढळल्याबाबत**

**(१७) १२६८८८ (०५-१२-२०१८). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेच्या ई प्रभाग क्षेत्र अंतर्गत येणा-या संजयनगर येथील निर्मित झालेल्या कच-याच्या डम्पिंग ग्राउंडमुळे या परिसरात डेंग्यूचे अनेक रुग्ण माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान आढळून आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या डम्पिंग ग्राउंडच्या समस्येबाबत महानगरपालिकेने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०२-२०१९) :** (१), (२) व (३) •कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील संजय नगर येथील २७ गावातील कचरा घंटागाडीने जमा करून दररोज आधारवाडी क्षेपणभूमीवर टाकला जातो.

•सदर ठिकाणी कचरा उचलल्यानंतर दररोज बॉयोकल्चर द्रव्य व जंतूनाशक फवारणी करण्यात येते.

•संजय नगर येथे कचऱ्याच्या समस्येमुळे डेंग्यूचे आजार फैलावणार नाहीत याची दक्षता महानगरपालिकेकडून घेतली जाते.

•सदर परिसरात डम्पिंग ग्राउंडमुळे डेंग्यूचे रूग्ण आढळून आले नसल्याचे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

---

**गिरणी कामगारांचा घरांचा प्रश्न सोडविण्याबाबत**

**(१८) १२६९२९ (०४-१२-२०१८). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यातील गिरणी कामगारांच्या प्रलंबित मागण्यांवर निर्णय घेण्यासाठी कामगार संघर्ष समितीने दि.२६ जुलै, २०१८ रोजी मुंबईतील म्हाडा कार्यालयावर तसेच दि.२८ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्या सुमारास मंत्रालयावर मोर्चा काढून आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, घरांसाठी अर्ज भरलेल्या १ लाख ७५ हजार कामगारांना घर मिळण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम जाहीर करण्याची व सोडत लागलेल्या सुमारे ५ हजार ५१ कामगारांना घराचा ताबा त्वरित मिळावा अश्या मागण्या शिष्टमंडळाने दिलेल्या निवेदनात केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी अद्याप कोणताही निर्णय घेतलेला नसल्यास, त्याची कारणे काय आहेत तसेच वर्षानुवर्षे न्यायाच्या प्रतिक्षेत असलेल्या गिरणी कामगारांच्या समस्या सोडविण्यासंदर्भात कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे व त्याची फलनिष्पत्ती काय आहे ?

**श्री. प्रकाश महेता (०८-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही. दि. २६.०७.२०१८ रोजी म्हाडाच्या कार्यालयात संघर्ष समितीने मोर्चा आयोजित केला होता. तथापि, दि. २५.०७.२०१८ रोजी उपाध्यक्ष, म्हाडा यांच्यासमवेत झालेल्या बैठकीत चर्चेअंती गिरणी कामगार कृती संघटनेचा मोर्चा स्थगित केल्याबाबत लेखी निवेदन सादर केले. तसेच अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण यांना दि. २८.०८.२०१८ रोजी दि. २७.०८.२०१८ रोजीचे निवेदन दिलेले आहे.
(२) गिरणी कामगार कृती संघटनेच्या सदर दि.२७.०८.२०१८ रोजीच्या निवेदनात १ लाख ७५ हजार गिरणी कामगारांनी म्हाडाकडे अर्ज भरले आहेत व या गिरणी कामगारांना घरे मिळावीत, यासाठी कृती आराखडा तयार करुन कालबध्द कार्यक्रम ठरवावा तसेच इतर मुद्द्यांबाबत विनंती केलेली आहे.
(३) संघटनेच्या सदर दि.२७.०८.२०१८ रोजीच्या निवेदनातील विविध मुद्द्यांच्या अनुषंगाने संबंधित विभागांसोबत मा. मुख्य सचिव महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.०६.१०.२०१८ रोजी बैठक झालेली असुन सदर बैठकीचे इतिवृत्त दि.१९.१०.२०१८ रोजी निर्गमित करण्यात आलेले आहे.

---

### मालाड (मुंबई) येथील वॉर्डनिहाय लोकसंख्या पाहता वॉर्डचे विभागीकरण करण्याबाबत

**(१९) १२७०८५ (०५-१२-२०१८). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईमध्ये वॉर्डनिहाय लोकसंख्या पाहता सर्वाधिक लोकसंख्या मालाडमध्ये असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कमी जागेवर खूप जास्त लोकसंख्या असल्यामुळे येथील पर्यावरणावर त्याचा गंभीर परिणाम होत असल्याचेही निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एवढ्या मोठ्या प्रमाणात लोकसंख्या असण्याची नेमकी काय कारणे आहेत,

(४) असल्यास, या वॉर्डचे विभागीकरण करण्याबाबत शासन कोणती उपाययोजना करणार वा करित आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१९) :** (१) सन २०११ मध्ये झालेल्या जनगणनेनुसार मालाड पी/उत्तर विभागाची लोकसंख्या ९,४३,३६६ इतकी असल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.
(२), (३), (४) व (५) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील विभागांचे आकारमान व लोकसंख्या यांमधील असमतोल विचारात घेऊन, महानगरपालिकेतील सर्व विभागांच्या पुनर्रचनेबाबतचा प्रस्ताव महानगरपालिकेच्या सर्व राजकीय पक्षांच्या गटनेत्यांच्या बैठकीत मान्यतेसाठी सादर करण्यात आला असता, सदर प्रस्तावावर प्राप्त झालेल्या सूचना विचारात घेऊन धोरणात्मक निर्णय घेण्याबाबतची कार्यवाही महानगरपालिका स्तरावर सुरु आहे.

तसेच, पी/उत्तर विभागाचे विभाजन करुन, नवीन विभाग कार्यालय पी/पूर्व विभाग या नावाने व विद्यमान पी/उत्तर विभाग कार्यालय पी/पश्चिम विभाग या नावाने संबोधण्याचे प्रस्तावित असल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

---

**पवना-इंद्रायणी या नद्यांना लागून असलेल्या रेड लाईन व ब्ल्यु लाईन रद्द करणेबाबत**

**(२०) १२७२४४ (०५-१२-२०१८). ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हातील पिंपरी-चिंचवड शहरातून पवना-इंद्रायणी या नद्या असून सन २००६ पासून शासनाने या दोन्ही नद्यांच्या बाजूने रेड लाईन व ब्ल्यु लाईन टाकलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भागातील शेतकऱ्यांचे व नागरिकांचे रेड लाईन व ब्ल्यु लाईनमुळे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासन सदर रेड लाईन व ब्ल्यु लाईन रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०२-२०१९) :** (१) ते (३) पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेची हद्द वाढ सन-१९९७ मध्ये झालेली असून शासनाने या क्षेत्राची भागश: विकास योजना दि. १८.०८.२००९ रोजी मंजूर केली असून सारभूत बदल हरकती/सूचना मागविण्यासाठी पुर्नप्रसिध्द केले होते. या पुर्नप्रसिध्द केलेल्या ई. पी. ८७ नुसार पाटबंधारे विभागाकडून प्राप्त झालेल्या पूर रेषा विकास योजना नकाशात दर्शविण्यात आल्या आहेत. सदर वगळलेल्या भागाची विकास योजना शासनाने दि.०२/०३/२०१५ रोजी मंजूर केली असून त्यानुसार पूररेषा विकास योजना नकाशावर दर्शविल्या आहेत.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या मुळ हद्दीत पाटबंधारे विभागाकडून पूररेषा प्राप्त करुन घेवून पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये वैधानिक कार्यवाही करुन तसा प्रस्ताव शासन मान्येतसाठी सादर केला असता त्यास शासनाने दि. १८.०९.२०१७ रोजी मंजूरी दिली असून त्यानुसार विकास योजना नकाशावर पूररेषा दर्शविण्यात आल्या आहेत. निळया पूररेषेच्या आत खुल्या स्वरुपाचे वापर जसे बगीचा, क्रिडांगण, स्मशानभूमी, Sewearge, Water Supply इ. अनुज्ञेय करण्यात आलेले असून निळी पूररेषा ते लाल पूररेषा या मध्ये लाल पूररेषेच्या ०.४५ मी. वर बांधकाम अनुज्ञेय केलेले आहे. निळी पूररेषा बाधीत विकसनशील विभागाचा चटई क्षेत्र निर्देशांक त्या क्षेत्राबाहेर लगत संबधित जमीनधारकाचे भूखंडात अनुज्ञेय करणेत आलेला असल्याने शेतक-यांचे नुकसान होत नाही. पूररेषा नदीच्या पूर परिस्थितीत संभाव्य मनूष्य हानी टाळणेसाठी आखलेल्या असल्याने त्या रद्द करणे शक्य नाही. त्यामुळे याबाबत शासनाकडून कार्यवाही अपेक्षित नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील कांदिवली पूर्व व पश्चिम विभागात अनधिकृत**
**मोबाईल टॉवर उभारण्यात आल्याबाबत**

**(२१) १२७२६३ (०६-१२-२०१८). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संजय कदम (दापोली), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.मधुसूदन केंद्रे (गंगाखेड), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कांदिवली पूर्व व पश्चिम विभागात अनधिकृत मोबाईल टॉवर उभे करण्यात आले असून तेथील रहिवाशांनी याबाबत तक्रार केल्यानंतर कारवाई करुनही पुन्हा मोबाईल टॉवर उभारण्यात येत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परिसरात किती मोबाईल टॉवर अनधिकृत असल्याचे आढळून आले आहे व त्यांचेविरुध्द कारवाई न करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१९) :** (१) व (२) मुंबई शहर व उपनगरामध्ये जमिनीवर तसेच, विविध इमारतींच्या गच्चीवर उभारण्यात येणाऱ्या किंवा अनधिकृतपणे उभारलेल्या मोबाईल टॉवर्सच्या परवानगी / नियमितीकरणाची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत करण्यात येते.

कांदिवली पूर्व व पश्चिम विभागात अनधिकृत मोबाईल टॉवर उभारण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेस तक्रारी प्राप्त झाल्यानंतर, महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी निष्कासन कारवाई करण्यात आली आहे.

दिनांक २९.१०.२०१८ रोजी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने महानगरपालिकेमार्फत स्थळपाहणी केली असता, निष्कासित केलेले मोबाईल टॉवर्स हे सद्य:स्थितीत निष्कासित अवस्थेत असल्याचे आढळून आले व सदर जागा निरीक्षणाखाली ठेवण्यात आल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

---

**मुंबईतील अनधिकृत जाहिरात फलकांवर कारवाई करणेबाबत**

**(२२) १२७३२५ (०६-१२-२०१८). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरासह रेल्वेच्या हद्दीत सुमारे १,१०० होर्डिंग जुनी असून ती कधीही कोसळून पुणे येथे नुकत्याच घडलेल्या दुर्घटनेची पुनरावृत्ती होण्याची दाट शक्यता असल्याची बाब दिनांक ११ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, मुंबईतील अनेक इमारतींच्या गच्चींवर देखील संबधित विभागाकडून कोणतीही परवानगी न घेता होर्डिंग लावण्यात आले असल्याने इमारतींच्या बांधकामास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे त्यानूसार मुंबई शहर व उपनगरातील अनेक इमारतींच्या गच्चीवर असलेली होर्डीग्जचे स्ट्रक्चरल ऑडिट करून धोकादायक असलेले होर्डिंग तात्काळ हटविण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१९) :** (१) मुंबई शहर व उपनगरांत १२७९ जाहिरात फलकांना जाहिरात प्रदर्शित करण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत परवानगी देण्यात आली आहे.

सदर जाहिरातींचे फलक हे जाहिरातीची मार्गदर्शक तत्वे २००८ चे निकष पूर्ण करीत असल्यास दर दोन वर्षांनी त्यांचे नुतनीकरण करण्यात येते. सदर नुतनीकरणाच्या वेळी परवानाधारक अभियंत्याने जाहिरात फलकांचे लेखापरीक्षणाद्वारे दिलेले संरचनात्मक स्थैर्यता प्रमाणपत्र व विमा प्रमाणपत्र घेण्यात येते.

तसेच, मुंबई शहर व उपनगरातील रेल्वेच्या हद्दीमध्ये, मध्य रेल्वेच्या हद्दीत २०१ व पश्चिम रेल्वेच्या हद्दीत २२३ जाहिरात फलके असून, सदर प्रकरणी महानगरपालिकेची जाहिरातीची मार्गदर्शक तत्वे लागू असावी याकरिता मा. सर्वोच्च न्यायालयात एसएलपी क्र. ११८१८/२०१८ दाखल करण्यात आली असल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(२) व (३) मुंबई शहर व उपनगरात इमारतीच्या गच्चीवर नवीन जाहिरात फलक उभारणीकरिता परवानगी देण्यात येत नाही.

तसेच, ३० वर्षांवरील जुन्या इमारतींच्या गच्चीवर असलेल्या जाहिरात फलकांचे नुतनीकरण न करण्याचे धोरण असून, सदर प्रकरणी जाहिरातदारांनी मा. उच्च न्यायालयात याचिका क्र. २८६९/२०१४ दाखल केली असून, सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पनवेल (जि. रायगड) येथील काळुंदे परिसरात सिडकोने ओएनजीसीला कर्मचारी निवासस्थाने उभारण्यासाठी दिलेल्या जागेबाबत**

**(२३) १२७६३५ (०६-१२-२०१८). श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि. रायगड) येथील काळुंदे परिसरात सिडकोने सुमारे ३० वर्षापुर्वी ओएनजीसीला कर्मचारी निवासस्थाने उभारण्यासाठी सुमारे ४७ हेक्टर जागा दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जागेवर निवासस्थाने न बांधता ओएनजीसीने त्या जागेचा स्फोटके ठेवण्यासाठी वापर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्फोटके ठेवण्यासाठी सिडकोची तसेच पोलीस आयुक्तांचीही परवानगी घेण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१९) :** (१) होय, सिडकोने मे.ओएनजीसीला काळुंद्रे, ता.पनवेल. जि.रायगड येथे कर्मचारी निवासस्थाने उभारण्यासाठी ४,७४,१२० चौ.मी. चा भूखंड वाटप केला आहे.

(२), (३) व (४) मे.ओएनजीसी कंपनीला वाटप केलेल्या मौजा काळुंद्रे, ता.पनवेल येथील भूखंडाच्या गेट नं.५ जवळ बारुद स्टोअर व मँगनीज असल्याचे निदर्शनास आल आहे. सदर

साठ्यासाठी पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांनी दि.१६.६.२०१७ च्या पत्रानुसार ना-हरकत प्रमाणपत्र दिले आहे.

मे.ओएनजीसी कंपनीला वाटप केलेल्या भूखंडांचा विकास ३० वर्षानंतरही केलेला नसल्याने सदर भूखंडाचा वाटप करारनामा रद्द करण्यासाठी व भूखंड १ महिन्याच्या कालावधीत सिडकोला हस्तांतरीत करण्याच्या अनुषंगाने दि.०६.०९.२०१७ रोजीच्या पत्रानुसार कळविण्यात आले होते. परंतु त्याविरोधात मे. ओएनजीसीने कंपनीने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र.३१३८/२०१७ दाखल केली असून सद्यस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दहिसर (मुंबई) येथील नवा गाव इनामदार चाळीत राहणाऱ्या भाडेकरुने अनधिकृत दुमजली बांधकाम केल्याबाबत**

**(२४) १२७६७२ (०६-१२-२०१८). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दहिसर (मुंबई) येथील सर्व्हे नं. १५२ भाग १ सीटीएस नं.८८० येथे नवा गाव इनामदार चाळीत राहणाऱ्या भाडेकरुने चाळ मालकाची परवानगी न घेता दुमजली अनधिकृत बांधकाम केल्याने तक्रार करुनसुध्दा महानगरपालिका अधिकारी दुर्लक्ष करीत असल्याने चाळमालकाने महानगरपालिका मुख्यालयासमोर आत्मदहन करण्याचा इशारा दिला असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१८ च्या चौथ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधितांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१९) :** (१), (२) व (३) दहिसर येथील सर्वे नं. १५२ भाग १ सीटीएस क्रमांक ८८० येथील बांधकामाबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने, सदर अनधिकृत बांधकामास मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५१ अन्वये नोटीस बजावली असून, पुढील कार्यवाही सुरु आहे.

तसेच, तक्रारदाराने माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये आत्मदहनाचा इशारा दिला नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

---

## मुंबईत एकूण १० हजार शौचालयांची दुरवस्था झाल्याबाबत

**(२५) १२७८०७ (०६-१२-२०१८). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील एकूण १० हजार शौचालयांच्या दुरुस्तीची गरज असून त्याला विलंब होत आहे त्यामुळे मोडकळीस आलेली शौचालये अधिक धोकादायक ठरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शौचालयाच्या दुरुस्तीवर महानगरपालिका व म्हाडाने सुमारे २१४ कोटी रुपये खर्च केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर दुरुस्तीच्या कामात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या गैरव्यवहाराची शासनाने चौकशी करुन संबंधित ठेकेदार व अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१९) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत बांधण्यात आलेल्या सुमारे १५५४ शौचालयांची दुरुस्ती नियमितपणे करण्यात येत असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) व (३) सदर शौचालयांच्या दुरुस्तीकरिता सन २०१७-१८ मध्ये रु. ७५.६८ कोटी इतक्या रकमेची तरतूद करण्यात आली होती, त्यापैकी रु. ५९.९४ कोटी इतकी रक्कम शौचालयांच्या दुरुस्तीवर खर्च करण्यात आली आहे.

तसेच, सन २०१८-१९ मध्ये शौचालयांच्या दुरुस्तीकरिता रु. ९६.९२ कोटी इतक्या रकमेची तरतूद करण्यात आली होती, त्यापैकी आतापर्यंत रु. २८.४५ कोटी इतकी रक्कम खर्च करण्यात आली आहे.

सदर दुरुस्ती करण्यात आलेली शौचालये सुस्थितीत असून, ती नागरिकांकडून वापरण्यात येत असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परळ (मुंबई) येथील केईएम रुग्णालयाची दुरवस्था झाल्याबाबत**

**(२६) १२७८२५ (०६-१२-२०१८). श्री.योगेश सागर (चारकोप), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परळ (मुंबई) येथील केईएम रुग्णालयातील रक्तपेढीजवळच्या भागात तळ मजल्यावर केइएम रुग्णालयाच्या सुमारे १८०० चौ. फुट जागेत शवागार असून हे बांधकाम जुने झाल्याने ठिकठिकाणी गळती सुरु आहे तसेच शवागाराची दुरवस्था झाल्याचे दिनांक २८ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे तळमजल्यावर क्र. ४ जवळील लिप्ट शेजारील स्लॅब कोसळून तीन कामगार जखमी झाल्याची घटना दिनांक १९ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास घडली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या शवागारात शवविच्छेदाचे काम करणारे डॉक्टर आणि कर्मचारी भितीच्या वातावरणात काम करीत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शवागारातील काही मृतदेह जागेअभावी व पुरेशा शवपेटया अभावी उघड्यावर ठेवण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१९) :** (१) परळ येथील के.ई.एम. रुग्णालयाच्या तळमजल्यावरील शवागाराचे बांधकाम जुने आहे हे खरे आहे.

तथापि, सदर शवागाराच्या इमारतीची संरक्षणात्मक परिक्षण तपासणी करण्यात आली असून, नियुक्त करण्यात आलेल्या सल्लागारांनी सुचविलेल्या शिफारशींनुसार मुख्य दुरुस्तीसाठी अंदाजपत्रक बनविण्याचे काम सुरु असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर ठिकाणी तात्पुरती डागडुजी करुन बांधकाम सुरक्षित केल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) हे खरे नाही.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सायन रुग्णालयातील (मुंबई) ६२ शस्त्रक्रिया विविध**
**कारणांमुळे पुढे ढकलण्यात आल्याबाबत**

**(२७) १२७८३९ (०६-१२-२०१८) श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), ॲड.वारीस पठाण (भायखळा), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा

वि.स. ५४४ (२५)

खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या सायन रुग्णालयात रुग्णांना लॉन्ड्रीतून कपडे धुवून न मिळाल्याने दिनांक २४ सप्टेंबर, २०१८ रोजी एकूण ४० शस्त्रक्रिया रद्द कराव्या लागण्याची वेळ रुग्णालय प्रशासनावर ओढवली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णालयातील गत पाच वर्षात ९ हजार ४२१ शस्त्रक्रिया करण्यात आल्या असून मात्र यातील ६२ शस्त्रक्रिया विविध कारणांमुळे पुढे ढकलण्यात आल्याची धक्कादायक बाब माहिती अधिकारातून निदर्शनास आली असल्याचे दिनांक ४ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, दिनांक २४ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास होणाऱ्या शस्त्रक्रियांसाठी रुग्णांना ३ महिन्यापूर्वी तारखा देण्यात आल्या होत्या आता पुन्हा नवीन तारखा कधी मिळतील ह्याची माहितीही प्रशासन देत नसल्याचे रुग्णांच्या नातेवाईकांनी सांगितले आहे, हे ही खरे आहे काय;

(४) असल्यास, शस्त्रक्रियेदरम्यान संसर्ग होऊ नये यासाठी रुग्णांना स्वच्छ कपडे आवश्यक असतात व ते न मिळाल्याने युरॉलाजी, आर्थोपेडीक, न्यूरालॉजी आणि जनरल शस्त्रक्रिया विभागातील ४० शस्त्रक्रिया रद्द कराव्या लागल्या तसेच पुढे ढकलण्यात आलेल्या शस्त्रक्रियांसाठी रुग्णालय प्रशासनाने वेगवेगळी कारणे दिली असून त्यात रक्ताचा तुटवडा, रुग्ण अनफिट असणे तसेच मनुष्यबळाचा अभाव अशी विविध कारणे देण्यात आली आहेत हे ही खरे आहे काय;

(५) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०२-२०१९) :** (१), (२), (३) व (४) सायन येथील लोकमान्य टिळक रुग्णालयात शल्यशस्त्रक्रियागार विभागातील ७ व मुत्ररोग शल्यशस्त्रक्रियागार विभागातील ८ अशा एकूण १५ शस्त्रक्रिया, त्या विभागात शस्त्रक्रियागार वस्त्रे महापालिका विद्युत धुलाई केंद्राकडून वेळेवर धुवून न मिळाल्याने रद्द कराव्या लागल्या ही वस्तुस्थिती आहे.

सदर रुग्णालयात दरवर्षी २५ ते २७ हजार छोटया व २४ ते २५ हजार मोठया शस्त्रक्रिया करण्यात येतात.

सदर रुग्णालयात दिनांक २४ सप्टेंबर, २०१८ रोजी एकूण ५९ मोठया व १५ छोटया शस्त्रक्रियांचे नियोजन करण्यात आले होते, त्यापैकी ३५ मोठया व १५ छोटया शस्त्रक्रिया विहित वेळेत पार पडल्या.

उर्वरित २४ मोठया शस्त्रक्रियांपैकी २ रुग्ण रुग्णालयात दाखल झाले नाहीत. तसेच, त्या दिवशी नियोजित करण्यात आलेल्या शस्त्रक्रिया लांबल्यामुळे व वेळेच्या अभावामुळे ७ शस्त्रक्रिया रद्द करण्यात आल्या.

शस्त्रक्रियागार वस्त्रांअभावी रद्द झालेल्या १५ शस्त्रक्रियांपैकी १३ शस्त्रक्रिया दिनांक २२.१०.२०१८ पर्यंत पार पाडण्यात आल्या आहेत व रुग्णालयात रुग्ण दाखल न झाल्यामुळे

उर्वरित दोन शस्त्रक्रिया प्रलंबित आहेत.
(५) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आलेली नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील केईएम रुग्णालयात उपचाराकरिता आलेल्या रुग्णाचा झालेला मृत्यु

**(२८) १२८००६ (०६-१२-२०१८). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील केईएम रुग्णालयात उपचारासाठी आलेल्या श्री.चांदणे यांना दम लागत असल्यामुळे इसीजीद्वारे प्रकृती गंभीर असल्याचे निदान झाल्यानंतरही अन्य वैद्यकीय चाचण्या करण्याचा सल्ला देण्यात आला त्यानुसार चाचणीसाठी रांगेत उभे असतांना त्यांची प्रकृती खालवल्याने कोसळून पडून जागीच मृत्यू झाल्याची बाब दिनांक ४ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, डॉक्टरांनी उपचारास विलंब करुन निष्काळजीपणा केल्याने श्री.चांदणे यांचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास येते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी संबंधित डॉक्टरांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१९) :**
(१) व (२) सदर रुग्ण हे रक्तदाब व मधुमेहाचा जुना आजार असलेले रुग्ण होते. त्यांना दोन दिवसांपासून छातीत दुखून दम लागत असल्यामुळे ते दिनांक ०३.१०.२०१८ रोजी के.ई.एम. रुग्णालयात आले होते.

सदर रुग्णाची तपासणी केल्यानंतर त्यांचा तात्काळ ईसीजी काढण्यात आला. सदर ईसीजीमध्ये काही बदल जाणवल्यामुळे त्यांचा सिरीयल ईसीजी करुन घेणे आवश्यक होते.

तथापि, सदर रुग्णास रांगेत चक्कर आल्याचे त्यांच्या नातेवाईकांनी कळविल्यानंतर, सदर रुग्णास व्हेण्टीलेटरवर ठेऊन त्यांचा रक्तदाब नियंत्रित करण्याचे सर्व प्रयत्न करण्यात आले. त्यानंतर चार तासानंतर त्यांचा मृत्यू झाल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.
(३) व (४) सदर रुग्णाच्या उपचारात कोणताही विलंब अथवा निष्काळजीपणा न झाल्यामुळे संबंधितांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नसल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

---

**मुंबई महानगरपालिकेने प्रसुतीगृह सुरु करण्यासाठी ९ खाजगी संस्थांना दिलेल्या जागांबाबत**

**(२९) १२८१७४ (०६-१२-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक खाजगी सहभाग प्रोत्साहन धोरणांतर्गत प्रसुतीगृह सुरु करण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने खाजगी संस्थांना जागा दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ९ संस्थांनी अटी व शर्तीचे उल्लंघन केल्याने महानगरपालिकेने कारणे दाखवा नोटीस बजावल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती दंडात्मक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी सुधारीत सार्वजनिक-खाजगी सहभाग प्रोत्साहन धोरण तयार करण्यात आले असून, ज्या दिनांकापासून कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे त्या दिनांकापासून परिगणित केलेले प्रमाणित मासिक भाडे दंड म्हणून आकारण्यात आले आहे.

तसेच, ज्या संस्थांनी अद्यापपर्यंत प्रमाणित भाडयाची रक्कम भरलेली नाही अशा संस्थांना कालमर्यादा निर्धारित करण्यात आली असून, प्रमाणित भाडयाची रक्कम न भरल्यास, संबंधित संस्थेकडून जागा परत घेण्याची कार्यवाही करण्यात येणार असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मनमाड (जि. नाशिक) शहरामध्ये गोसावी समाजाच्या**
**दफनभूमीसाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३०) १२८७०७ (०६-१२-२०१८). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनमाड (जि.नाशिक) शहरामधील एच.ए.के हायस्कूलमागील १५ गुंठे जागा गोसावी समाजाच्या दफनभूमीसाठी देण्यात यावी अशी मागणी गोसावी समाज संस्थेच्या वतीने शासनाकडे करण्यात आल्याचे दिनांक २० ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत ७ वर्षापासून गोसावी समाजाकडून वारंवार मागणी होऊनही गोसावी

समाजासाठीच्या दफनभूमीचा प्रश्न अद्याप प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, गोसावी समाजाच्या दफनभुमीसाठी तात्काळ जागा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०२-२०१९) :** (१) गोसावी समाज संस्थेकडून दफनभूमीसाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत मागणी होत आहे. एच. ए. के. हायस्कूलमधील जागे संदर्भातही दि.०६/०८/२०१८ च्या निवेदनान्वये मागणी करण्यात आलेली आहे.
(२) व (३) मनमाड नगर परिषदेने शासनाकडे मनमाड शहरासाठी तिसरी सुधारित प्रारुप विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३० अन्वये शासनास मंजुरीसाठी सादर करताना एम-१५ फेरबदलान्वये स.न. ६५ पै. या शासकिय जमिनीपैकी ३०००.०० चौ. मी. क्षेत्रावर नव्याने आ.क्र.५६ "विरशैव लिंगायत समाज व गोसावी समाज दफनभूमी" यासाठी आरक्षण प्रस्तावित केलेले आहे.
शासनाने दि.२८/०२/२०१८ रोजीच्या अधिसूचनेन्वये भागश: विकास योजनेस मंजूरी प्रदान केली आहे. मनमाड नगर परिषदेने नव्याने प्रस्तावित आ.क्र. ५६ हे सारभूत स्वरुपाचे फेरबदल असल्याने त्याचा अंतर्भाव पुनर्प्रसिद्ध विकास योजनेत (वगळलेल्या भागात) केला आहे व सदर सारभूत फेदबदलाबाबत सूचना प्रसिद्ध केली असून त्यावर सूचना / हरकती मागविण्यात आलेल्या आहेत. प्राप्त हरकती / सूचनेवर संबंधितांना सुनावणी देवून अहवाल सादर करण्यासाठी सह संचालक नगर रचना, नाशिक विभाग, नाशिक यांची "अधिकारी" म्हणून नियुक्ती केलेली आहे. शासन नियुक्त अधिकाऱ्याकडून अहवाल प्राप्त झाल्यावर अधिनियमान्वये विहित केलेल्या मुदतीत शासनाकडून पुनर्प्रसिद्ध विकास योजनेस मंजूरी प्रदान करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईसह राज्यात भटक्या कुत्र्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्याबाबत**

**(३१) १२८७२४ (०५-१२-२०१८). श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम**

**जगताप (अहमदनगर शहर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संजय कदम (दापोली), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.मधुसूदन केंद्रे (गंगाखेड), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यात भटक्या कुत्र्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून शासनाने आतापर्यंत भटक्या कुत्र्यांना आळा घालण्यासाठी कोणतीही उपाययोजना केलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईसह राज्यात अनेक ठिकाणी लहान मुलांसह अनेक नागरीकांवर भटक्या कुत्र्यांनी हल्ला केल्याच्या अनेक घटना घडत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भटक्या कुत्र्यांचा तात्काळ बंदोबस्त करण्यासंदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) होय.

(३) शासन निर्णय दिनांक ११ नोव्हेंबर, २०१६ अन्वये कुत्र्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्ये करीता प्राणी जन्म नियंत्रण - पर्यवेक्षण समित्या स्थापन करणे व श्वान नसबंदी संदर्भात सूचना सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना दिलेल्या आहेत.

तसेच शासन परिपत्रक दिनांक २२ नोव्हेंबर, २०१६ अन्वये The prevention of cruelty of Animals Act व The Animal Birth Control (Dogs) Rules, २००१ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची सुचना सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना दिल्या आहेत.

शासन परिपत्रक दिनांक ०५ नोव्हेंबर, २०१६ अन्वये राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्रातुन श्वानदंशावरील लस मोफत देण्याबाबत सूचना दिल्या आहेत.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## मुंबईतील अनुदानित व विनाअनुदानित ४७८ शाळांनी महानगरपालिकेकडून पुनर्मान्यतेची परवानगी घेतली नसल्याबाबत

**(३२) १२८७८४ (०६-१२-२०१८). श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अनुदानित व विनाअनुदानित ४७८ शाळांनी महानगरपालिकेकडून पुनर्मान्यतेची परवानगी घेतली नसल्यामुळे त्यांची मान्यता रद्द होणार असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शाळांची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार या शाळांना मान्यता देऊन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान रोखण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार वा करित आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१९) :** (१), (२) व (३) मान्यता मुदतवाढ देण्यासाठी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ मधील अटी व शर्तीची पूर्तता न केल्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील अनुदानित ११९ व विनाअनुदानित ४२७ अशा एकूण ५४६ शाळांचे मान्यता मुदतवाढ देण्याबाबतचे प्रस्ताव कार्यान्वित असून, सदर शाळा नियमितपणे सुरु असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

---

**श्रीगोंदे शहरात (जि.अहमदनगर) नगरोत्थान योजनेअंतर्गत रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत**

**(३३) १२८८२० (०६-१२-२०१८). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्रीगोंदे शहरात (जि.अहमदनगर) नगरोत्थान योजनेंतर्गत ३३ कोटी रुपयांच्या खर्चातून १७ रस्त्यांची कामे सुरु करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रस्त्यांची कामे सुरु असताना माहे जून, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान रस्त्याला खड्डे पडल्याचा प्रकार निदर्शनास आल्यामुळे तेथील सामाजिक कार्यकर्त्यांनी रस्त्याला सलाईन देऊन अनोख्या पध्दतीने आंदोलन सुरु केले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०२-२०१९) :** (१) (२), (३), (४) व (५)
• महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (राज्यस्तर) योजनेअंतर्गत श्रीगोंदा शहरातील १७ रस्त्यांची कामे प्रगतीपथावर आहेत.
• जुन, २०१८ च्या दरम्यान शहरातील सिध्दार्थनगर ते जोधपूर मारुतीचौक या रस्त्यावर खड्डा पडल्याचे निदर्शनास आल्यावर कंत्राटदाराकडून सदर खड्डा बुजविण्यात आलेला आहे, हे खरे आहे.
• या कामाचे थर्डपार्टी ऑडीट कॉलेज ऑफ इंजिनिरींग, पुणे यांनी केलेले आहे. या अहवालानुसार सदर रस्त्याचे काम समाधान कारक व योग्य दर्जाचे झाले असल्याचे नगरपरिषद, श्रीगोंदा यांनी कळविलेले आहे.

---

**सिडकोने प्रसिध्द केलेल्या जाहिरातीला मुंबई ग्राहक पंचायतीने आक्षेप घेतल्याबाबत**

**(३४) १२९४४८ (२९-१२-२०१८). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात घरांच्या लॉटरीसंदर्भात सिडकोने प्रसिध्द केलेल्या जाहिरातीला मुंबई ग्राहक पंचायतीने माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान आक्षेप घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई ग्राहक पंचायतीने कोणत्या मुद्दयांवर आक्षेप घेतला आहे, त्यानुसार शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, त्याचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१९) :** (१) व (२) मुंबई ग्राहक पंचायती कडून घरांच्या लॉटरीसंदर्भात सिडकोने प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीला ऑगस्ट,२०१८ मध्ये वा त्यासुमारास आक्षेप घेतल्याची बाब निदर्शनास आलेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगाव (जि.नाशिक) महानगरपालिका बांधकाम विभागामार्फत झालेल्या कामांच्या देयकांना स्थगिती देऊन सदर कामांची चौकशी करण्याबाबत**

**(३५) १२९५४८ (०७-१२-२०१८). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि.नाशिक) महानगरपालिका बांधकाम विभागामार्फत झालेल्या कामांच्या देयकांना स्थगिती देऊन सदर कामांची चौकशी करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, अद्यापपर्यंत प्रत्यक्षात किती विकासकामे करण्यात आली आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी दोषी आढळून येणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०२-२०१९)** :(१) होय.
(२) व (३) मा.विधानसभा सदस्य यांनी पत्रात नमुद केलेल्या मुद्यांसंदर्भात त्रयस्थ यंत्रणेमार्फत सखोल चौकशी करुन, तद्नंतर प्रलंबित बिले अदा करण्याबाबत नियमानुसार पुढील कार्यवाही करण्याचे आयुक्त, मालेगाव महानगरपालिका यांना दिनांक २९ ऑगस्ट, २०१८ अन्वये कळविण्यात आले आहे.

सदरची १५६६ कामे ही रु.५ लक्ष पर्यंतच्या रकमेची आहेत. त्यापैकी रु.२ ते ५ लक्ष रकमेच्या कामांचे त्रयस्थ यंत्रणेमार्फत तांत्रिक लेखापरीक्षण करण्यात आलेले असून, रु.२ लक्ष रकमेच्या आतील कामांचे तांत्रिक लेखापरिक्षण करण्यात आलेले नाही.

मा.लोकप्रतिनिधी यांनी मागणी केल्यानुसार सर्वच एकूण १५६६ कामांचे पुन:श्च त्रयस्थ यंत्रणेमार्फत चौकशी करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत पाठपुरावा सुरु असून, चौकशी पुर्ण झाल्याशिवाय देयके अदा केली जाणार नाहीत, असे मालेगाव महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मालेगाव (जि.नाशिक) महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध प्रभागांमध्ये सर्वसाधारण निधीतून झालेल्या विकासकामांची त्रयस्थ यंत्रणेकडून चौकशी होणेबाबत

**(३६) १२९५५२ (०७-१२-२०१८). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि.नाशिक) महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध प्रभागांमध्ये मागील आर्थिक वर्षातील सर्वसाधारण निधीतून बोगस विकासकामे झाल्याचा संशय व्यक्त होत असून ३४ कोटी रुपये खर्चाच्या संशयास्पद एक हजार ५६६ कामांची चौकशी स्थानिक यंत्रणेकडून न करता ती त्रयस्थ यंत्रणेकडून करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी नगरविकास विभागाकडे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पथकाने कामाच्या दर्जाची तपासणी केली असता त्यात काय आढळून आले आहे, त्यानूसार दोषी आढळून येणा-या ठेकेदारांवर कोणत्या स्वरुपाची कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०२-२०१९) :** (१) होय.

(२) मा.विधानसभा सदस्य यांनी पत्रात नमुद केलेल्या मुद्यांसंदर्भात त्रयस्थ यंत्रणेमार्फत सखोल चौकशी करुन, तद्नंतर प्रलंबित बिले अदा करण्याबाबत नियमानुसार पुढील कार्यवाही करण्याचे आयुक्त, मालेगाव महानगरपालिका यांना दिनांक २९ ऑगस्ट, २०१८ अन्वये कळविण्यात आले आहे.

मा.लोकप्रतिनिधी यांनी मागणी केल्यानुसार सर्वच एकूण १५६६ कामांचे पुन:श्च त्रयस्थ यंत्रणेमार्फत चौकशी करण्यासाठी महानगरपालिकेचा पाठपुरावा सुरु असून, चौकशी पुर्ण झाल्याशिवाय देयके अदा केली जाणार नाहीत, असे मालेगाव महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील गोळीबार सांताक्रुझ (पूर्व) येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबत**

**(३७) १२९६४१ (०४-१२-२०१८). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गोळीबार सांताक्रुझ (पूर्व) येथे झोपडपटटी पुनर्वसन योजनेतंर्गत सन २००८ व सन २००९ साली रिक्त झालेल्या पात्र झोपडीधारकांना प्राधिकरण परिपत्रक क्र.१६२ नुसार पुनर्वसन इमारतीत सदनिका वाटपात प्राधान्य देण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१० साली रिक्त केलेल्या झोपडीधारकांना विकासक मे.शिवालिक व्हेन्चर व प्राधिकरणातील अधिकारी यांनी संगनताने पुनर्वसन इमारतीत सदनिका वाटप केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या विरोधात खार-सांताक्रुझ (पूर्व) जवाहर नगर, गोळीबार झोपडटटी संयुक्त कृती समिती यांनी मा.अप्पर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग यांना दिनांक १६ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे ही खेर आहे काय,

(४) असल्यास, या निवेदनानुसार या बेकायदा सदनिका वाटपाबाबत चौकशी करुन सदर विकासक व संबंधित अधिकारी यांच्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०१-०२-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही, असा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.

(३) खार सांताक्रुझ जवाहर नगर गोळीबार झोपडपट्टी संयुक्त कृती समिती यांचे शासनास प्राप्त झालेले दि.२०.०२.२०१८ चे निवेदन दि.२२.०३.२०१८ च्या पत्रान्वये योग्य त्या पुढील कार्यवाहीस्तव झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास पाठविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

(५) प्रश्न उद्भवत नाही

---

## मुंबईतील नागरिकांना आरोग्याच्या चांगल्या सेवा देण्यास महानगरपालिका कुचकामी ठरल्याचा ठपका ठेवल्याबाबत

**(३८) १२९९७७ (०७-१२-२०१८). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील प्रजा फाऊंडेशनने हंसा रिसर्चच्या माध्यमातून केलेल्या सर्व्हेक्षण आणि माहितीच्या अधिकाराद्वारे तयार केलेल्या अहवालात मुंबईकरांना आरोग्याच्या चांगल्या सेवा देण्यास मुंबई महानगरपालिका कमकुवत ठरल्याचा ठपका माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान ठेवण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील अहवाल महानगरपालिका प्रशासनाला तसेच शासनाकडे सादर केला आहे काय,

(३) असल्यास, कोणकोणत्या बाबी नमूद करण्यात आल्या आहेत व सदर अहवालानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१९) :** (१) व (२) मुंबईतील प्रजा फाऊंडेशनने हंसा रिसर्चच्या माध्यमातून अवैध पध्दतीने सर्वेक्षण केले असून, माहितीच्या अधिकाराद्वारे चुकीचा अहवाल तयार केला असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

सदर अहवाल व त्याचे निष्कर्ष बृहन्मुंबई महानगरपालिकेने अमान्य ठरविले असून, सदर संस्थेस आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी “अमान्य संस्था” (Persona Non-grata) असे घोषित केले आहे.

(३) प्रजा फाऊंडेशन या संस्थेने, महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांचे कुपोषण ठरवितांना अगोदर उंची व वजन असे निकष लावले आहेत. तसेच, नंतरच्या वर्षी वय व वजन असे निकष लावले आहेत. त्यामुळे एकूण कुपोषित विद्यार्थी यांची तुलना होऊ शकत नाही.

तसेच, क्षयरुग्ण आणि डेंग्यु रुग्णांच्या बाबतीतही सदर बाब आढळून आली आहे.

त्यामुळे प्रजा फाऊंडेशन या संस्थेने या आकडेवारीची अवैज्ञानिक तुलना करुन अत्यंत चुकीचे निष्कर्ष काढले असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पंडित मदन मोहन मालवीय शताब्दी रुग्णालयाच्या प्रस्तावित नविन रुग्णालय व वैद्यकिय महाविद्यालयाबाबत

**(३९) १३०११७ (०७-१२-२०१८). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंडित मदन मोहन मालवीय शताब्दी रुग्णालय, गोवंडी, मुंबई या रुग्णालयाचे प्रस्तावित

नवीन रुग्णालय व वैद्यकिय महाविद्यालयाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास मा.आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यांना लेखी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व त्याचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१९) :**

(१) हे खरे आहे.

(२) व (३) सध्या अस्तित्वात असलेल्या पंडित मदन मोहन मालवीय शताब्दी रुग्णालयाशेजारील मोकळया जागेत पहिल्या टप्प्यात नवीन रुग्णालयाची ५८० रुग्णशय्यांची इमारत उभारणीचे काम प्रगतीपथावर आहे.

तसेच, वैद्यकीय महाविद्यालय उभारण्यासाठी ५०० रुग्णशय्येचे सुसज्ज रुग्णालय व कमीतकमी १० एकर क्षेत्रफळाची जागा उपलब्ध असणे आवश्यक असून, सद्य:स्थितीत पंडित मदन मोहन मालवीय शताब्दी रुग्णालयाच्या आवारात ८.३१ एकर जागा उपलब्ध आहे. सदर रुग्णालयालगत असलेली २ एकर जागा हस्तगत केल्यानंतर वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याची कार्यवाही करण्यात येणार असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

---

## मुंबई महानगरपालिकेच्या माहिम येथील प्रस्तुतिगृहातील तळमजल्यावरील रिफुजी जागेचा अनधिकृतपणे वापर होत असल्याबाबत

**(४०) १३०१७७ (०८-१२-२०१८). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या माहिम येथील प्रस्तुतिगृहातील तळमजल्यावरील रिफुजी जागा संबंधित अधिकाऱ्यांकडून स्किल्ड लॅब (अद्ययावत ट्रेनिंग सेंटर) बांधण्यासाठी अनधिकृतपणे बळकावली असल्याचे माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तुतिगृहात महिन्याला साधारण दीड हजार महिला उपचार घेत असतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रस्तुतिगृहाची जागा स्किल्ड लॅबला देण्यास नागरिकांचा विरोध असून उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, तद्नुसार चौकशीत काय निष्पन्न झाले, चौकशीनूसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१९) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या माहिम येथील प्रसुतीगृहातील तळमजल्यावरील जागा स्किल्स लॅबसाठी वापरण्यात येणार होती.

सदर स्किल्स लॅब हे एक प्रशिक्षण केंद्र असून, त्यामध्ये महानगरपालिकेच्या डॉक्टर, नर्सिंग स्टाफ व इतर स्टाफ इत्यादींना अद्ययावत प्रात्यक्षिक/प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

(२) सदर प्रसुतीगृहात महिन्याला सरासरी ७०० ते ८०० महिला उपचार घेत असतात.

(३) व (४) सदर स्कील लॅबबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य समितीमध्ये हरकतीचा मुद्दा उपस्थित करुन, सदर स्किल लॅबला विरोध असल्याचे कळविले आहे.

त्यानुसार सदर प्रसुतीगृहात स्किल लॅब सुरु न करता इतरत्र सुरु करण्याचे प्रस्तावित केले असल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

---

## मंगळवेढा (जि.सोलापूर) येथील नगरपालिका मुख्याधिकारी यांच्या कार्यपध्दतीची चौकशी करण्याबाबत

**(४१) १३१२३९ (०८-१२-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) येथील मंनगरपालिका मुख्याधिकारी यांच्या कामकाजाला कंटाळून व सततच्या गैरहजेरीबाबत नगराध्यक्षा, मंगळवेढा यांनी जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्याकडे तक्रार केल्याचे दिनांक २८ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुख्याधिकारी यांच्या कार्यपध्दतीची चौकशी करून त्यांची तात्काळ बदली करावी अशीही मागणी करण्यात आल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०२-२०१९) :**(१) होय, अशी तक्रार करण्यात आली आहे.

(२) व (३)

- तत्कालिन मुख्याधिकारी, मंगळवेढा यांच्याबाबतच्या तक्रारींच्या अनुषंगाने त्यांची अन्यत्र बदली करण्यात आली आहे. मुख्याधिकारी, मंगळवेढा या पदावर अन्य अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली आहे.
- तत्कालिन मुख्याधिकारी यांच्या विरुद्धच्या प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या स्तरावरुन उपविभागीय अधिकारी, मंगळवेढा यांच्यामार्फत चौकशी करण्यात येत आहे.
- शासन स्तरावर प्राप्त तक्रारींच्या अनुषंगानेदेखील तत्कालिन मुख्याधिकारी, मंगळवेढा यांची आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांच्या

स्तरावरुन प्राथमिक चौकशी करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरातील महानगरपालिकेच्या नालेसफाई, रस्ते व कचरा वाहतुकीमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(४२) १३१८५१ (०५-१२-२०१८). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील महानगरपालिकेच्या नालेसफाई, रस्ते व कचरा वाहतुकीत मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाल्याप्रकरणी मा.मुख्यमंत्री महोदय यांनी कामांचे स्वरूप व तपशिल, अवलंबलेली कार्यपध्दती, देयक अदायगीची पध्दत, नोंदी याचा स्वंयस्पष्ट अहवाल सादर करण्याबाबतचा आदेश महानगरपालिका प्रशासनास दिला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.मुख्यमंत्री यांच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०२-२०१९) :** (१) अशा आशयाचे शासन पत्र महानगरपालिका प्रशासनास दिले आहे, हे खरे आहे.
(२) व (३) याबाबत पुणे महानगरपालिकेकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील योग्य ती कार्यवाही करण्याचे प्रयोजन आहे.

---

**पुणे येथील आरक्षित भूखंडांचा विकास करून विविध गृह योजनामध्ये बांधलेल्या एक हजार सदनिका विनावापर पडून असल्याबाबत**

**(४३) १३१८५७ (०८-१२-२०१८). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील आरक्षित भूखंडांचा विकास करून विविध गृह योजनांमध्ये बांधलेल्या एक हजार सदनिका गत काही वर्षांपासून विनावापर पडून असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हडपसर औंध बोपोडी, धनकवडी, कोथरूड, कर्वेनगर, एरंडवणे व जवळपासच्या भागात ह्या सदनिका असून त्यांचा ताबा महानगरपालिका प्रशासनाकडे असतांना त्याकडील दुर्लक्षतेमुळे यातील बहुतेक सदनिकांची दुरवस्था झाली असून या सदनिकांचा सुरक्षिततेच्या अभावी अनेकवेळा दुरुपयोग ही होताना दिसत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील नागरिकांसाठी, विस्थापितांसाठी तसेच

महानगरपालिकेच्या तृतीय, चतुर्थ श्रेणीतील कर्मचाऱ्यांनी वेळोवेळी रीतसर मागणी करून व पत्रव्यवहार करूनसुद्धा त्यांना त्या सदनिका दिल्या जात नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०२-२०१९) :** (१) होय, महानगरपालिका प्रकल्प बाधित व रस्तारुंदी बाधित रहिवाश्यांना वाटप करुन शिल्लक राहिलेल्या सदनिका प्रकल्प बाधित विस्थापितांचे पुनर्वसन करावयाची मागणी संबंधित विभागांकडून प्राप्त न झाल्याने पुनर्वसना अभावी एकूण ८८८ सदनिका विना वापर पडून असल्याची वस्तुस्थिती आहे.
(२) होय, सदनिकांची अंशःत दुरवस्था झाली असून काही प्रमाणात सदनिकांचा सुरक्षिततेच्या अभावी दुरुपयोग होताना निदर्शनास आलेले आहे, असे निदर्शनास आल्यानंतर वेळोवेळी कारवाई करणेत येते.
(३) होय, विकास नियंत्रण नियमावली मधील नियम क्र. आर-७ या तरतुदीनुसार केवळ प्रकल्पामुळे विस्थापितांसाठी सदनिका देण्याची तरतूद असल्याने महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना सदनिका देता येणे शक्य नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भिवंडी महानगरपालिका क्षेत्रातील दररोज जमा होणारा कचरा शहरातून गोळा करुन डम्पिंग ग्रऊंडवर टाकण्याबाबतचा प्रस्ताव

**(४४) १३२२१७ (१०-१२-२०१८). श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी महानगरपालिका क्षेत्रातील दररोज जमा होणारा एकूण ३०० मेट्रिक टन कचरा शहरातून गोळा करुन डम्पिंग ग्रऊंडवर वाहतुक करण्यासाठी नालासोपारा येथील साई गणेश इंटरप्रयझेस या कंपनीने दिलेल्या दीड कोटी रुपयांच्या प्रस्तावास महानगरपालिका प्रशासनाने मान्यता दिली असल्याची माहिती माहे जुलै, २०१८ च्या शेवटच्या आठवडयात वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नव्या प्रस्तावास पुढील मान्यता देण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०१-२०१९) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोंडपिपरी (जि.चंद्रपूर) नगरपंचायतीमधील वृक्ष लागवड व डस्टबीन खरेदी विक्री कामात लाखो रुपये खर्च केल्याबाबत**

**(४५) १३२७०६ (१०-१२-२०१८). अॅड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंडपिपरी (जि.चंद्रपूर) नगरपंचायतीमधील वृक्ष लागवड व डस्टबीन खरेदी विक्री कामात लाखो रुपये खर्च केल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोंडपिपरी नगरपंचायतीने पर्यावरण संरक्षणाच्या नावावर निधीचा अपव्यय वृक्षलागवडीकरीता करुन शासनाची दिशाभुल केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सहाय्य अनुदान योजनंतर्गत २१ लक्ष रुपये दाखवुन २,२०० रुपये खर्च करुन शासनाच्या निकषाचे पालन न करता नियमबाहय पद्धतीने निधी खर्च केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय,चौकशीअंती काय निष्पन्न झाले, त्यानूसार दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०२-२०१९) :** (१) अशा आशयाचे वृत्त दिनांक १४ सप्टेंबर, २०१८ रोजीच्या "दैनिक पुण्यनगरी" या वर्तमानपत्राच्या अंकात छापून आले होते, हे खरे आहे.

(२), (३) व (४)

- गोंडपिंपरी नगरपरिषदेने वृक्ष लागवड व त्यांच्या संगोपनाकरीता अंदाजपत्रकास सक्षम प्राधिकाऱ्यांची तांत्रिक मान्यता तसेच प्रशासकीय मान्यता घेऊन खर्च केला आहे.
- तांत्रिक मंजूरीनुसार मूळ कामांची किंमत रुपये २१,३४,०८०/- इतकी होती. त्यामध्ये आकस्मिक खर्च व जी.एस.टी. च्या रक्कमा मिळवून रुपये २४,३२,८५१.२०/- एवढ्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने तांत्रिक मंजूरी दिली व नगरपरिषदेने प्रशासकीय मंजूरी दिली.
- निविदा प्रक्रिया राबवून यशस्वी निविदाकारास दिनांक ४/७/२०१८ रोजी याबाबतचे कार्यारंभ आदेश देण्यात आले.
- कार्यारंभ आदेश व करारनाम्यानुसार निविदाकाराने ३ महिन्यात ९५० रोपांची लागवड करणे आवश्यक होते. दिनांक ५/९/२०१८ पर्यंत त्यांनी ६६० रोपांची लागवड केल्याचे आढळल्याने दिनांक ५/९/२०१८ रोजी मोजमापे नोंदवून ६६० रोप लागवडीचे रुपये ११,०५,६७४/- एवढ्या रक्कमेचे देयक निविदाकारास दिनांक ७/९/२०१८ रोजी प्रदान करण्यात आले. पूर्ण ९५० रोपे लागवडीचे देयक प्रदान करण्यात आलेले नाही.
- उर्वरित २९० रोपे दिनांक ७/९/२०१८ ते दिनांक १०/९/२०१८ पर्यंत लावण्यात आली आहेत. अंतिम देयक प्रदान करण्यापूर्वी सर्व ९५० रोपांची पुन्हा तपासणी केली असता त्यामध्ये ३६ रोपे मृत पावल्याचे आढळून आले आहे. निविदेतील अटीनुसार नगरपरिषदेने निविदाकारास

दिनांक ३१/१०/२०१८ रोजी मृत रोपांचे पुन:र्रोपण करण्याबाबत कळविले होते. त्यानुसार सदर ३६ रोपांचे पुन:र्रोपण करण्यात आले आहे. अद्याप २९० रोपे लागवडीची रक्कम निविदाकारास मंजूर करण्यात आलेली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईत म्हाडाच्या बहुतांश जमिनींवर अतिक्रमण झाल्याबाबत**

**(४६) १३२७१९ (०४-१२-२०१८). कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील म्हाडाच्या बहुतांश जमिनींवर अतिक्रमण असल्यामुळे म्हाडाला मागील तीन वर्षात केवळ २५०० घरेच उभारता आल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईत म्हाडाची जमीन किती क्षेत्रफळ आहे याची माहिती देखील म्हाडाकडे उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने १ जिल्हाधिकारी, १ तहसीलदार, ५ नायब तहसीलदार अशी पदे गेली कित्येक वर्ष भरली नसल्यामुळे अतिक्रमण हटविण्याच्या कामात विलंब होत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत चोकशी करून म्हाडाची रिक्त पदे लवकरात लवकर भरून म्हाडाच्या जमिनींवर असणारे अतिक्रमण हटवून जास्तीची नवीन घरे उभारण्यासाठी शासन कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०८-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) सदरहू पदे भरण्याबाबत म्हाडाने महसूल विभागास विनंती केलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मे.किंग्ज बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स हा विकासक पुनर्विकासाच्या नावाखाली चुनाभट्टी श्रमीक सहकार गृहनिर्माण संस्थेचे अस्तित्व नष्ट करीत असल्याबाबत**

**(४७) १३२८५७ (०४-१२-२०१८). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मे.किंग्ज बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स, नेहरुनगर, कुर्ला, मुंबई हा विकासक पुर्नविकासाच्या

नावाखाली चुनाभट्टी श्रमीक सहकार गृहनिर्माण संस्था मर्यादित तसेच श्री.गुरुदत्त कृपा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, हिल रोड, सायन, चुनाभट्टी, मुंबई-२२ या दोन नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्था एकत्रित करताना चुनाभट्टी श्रमिक सहकारी गृहनिर्माण संस्थेचे अस्तित्व नष्ट करीत असल्याप्रकरणी विकासकावर कारवाई करण्यासाठी तेथील रहिवाशांनी मा.गृहनिर्माण मंत्री यांच्याकडे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निवेदनाद्वारे मागणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, तद्नुसार चौकशीत काय निष्पन्न झाले आहे,

(३) असल्यास, उपरोक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने विकासकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०८-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही. सदरहू निवेदन शासनास तसेच उपनिबंधक, म्हाडा यांना प्राप्त झालेले नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वाशिम नगरपरिषदेच्या नगरोत्थान योजनेतून शहरांतर्गत रहदारीच्या मुख्य रस्त्यांच्या नुतनीकरणाच्या कामाबाबत

**(४८) १३३३८१ (१०-१२-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम नगरपरिषदने नगरोत्थान योजनेतून मंजूर ८१.५१ कोटी रुपयांच्या निधीतून शहरांतर्गत रहदारीच्या मुख्य रस्त्यांच्या नुतनीकरणाचे काम हाती घेतले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकाच वेळी अनेक ठिकाणचे मुख्य रस्ते खोदून ठेवले असताना सर्वच ठिकाणी कामातील विलंबामुळे नागरीकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खोदलेल्या रस्त्यावर “बोल्डर गिट्टी” टाकण्यात आल्याने त्यावरुन वाहने चालविणे अशक्य हात असल्याने शहरवासियांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या कामांना गती देण्याबाबत तसेच या रस्त्यांच्या कामांचा दर्जा राखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) (३) व (४)

- शहरामधील मुख्य रस्त्याच्या ठिकाणी रस्ता खोदून आवश्यक साहित्य वापरुन कामे पूर्ण करण्यात येत आहेत. दरम्यान नागरिकांकरिता शहरामधील इतर रस्त्यांचा वापर होत असल्याने गैरसोय टाळली जात आहे.
- शहरातील शिवाजी चौकाजवळील नाल्याच्या कामामुळे रस्ता बंद असून त्यासाठी पर्यायी वळण रस्त्याची व्यवस्था करण्यात आली आहे.
- निविदा प्रक्रिया नुसार सदर रस्त्यांची कामे पूर्ण करण्याची मुदत कार्यादेशाचा दिनांक १२/७/२०१६ पासून १५ महिने (पावसाळा धरुन) इतकी होती. यासाठी नगरपरिषदेने वेळोवेळी ठराव घेऊन दिनांक ३०/११/२०१८ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. तसेच कामे प्रगती पथावर असल्याने सदर कामांना दिनांक २८/२/२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्याचे नगरपरिषदेचे नियोजन आहे, असे मुख्याधिकारी यांनी कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## देशाचे संरक्षण करणारे माजी सैनिक आणि त्यांच्या विधवा यांना मालमत्ता कर माफी करण्याबाबत

**(४९) १३३४२७ (१०-१२-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देशाचे संरक्षण करणारे माजी सैनिक आणि त्यांच्या विधवा यांना मालमत्ता कर माफी करण्याबाबत माजी सैनिक संघटना यांनी दिनांक १६ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्याधिकारी, नगरपरिषद, देऊळगावराजा यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व त्याचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०२-२०१९) :** (१) होय.
(२) मालमत्ता करामध्ये सुट देण्याची कार्यवाही देऊळगांवराजा नगरपरिषदेमार्फत प्रस्तावित आहे. असे नगरपरिषद देऊळगांवराजा यांनी कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी निजामपूर शहर (जि.ठाणे) महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती क्रमांक ३ मधील मौजे कामतघर येथील मे. एम.के. वाय इन्फ्रास्ट्रक्चरचे भागीदार घनश्याम पटेल यांनी नियमबाह्य बांधकाम केल्याबाबत**

**(५०) १३४७७७ (३०-०१-२०१९). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी निजामपूर शहर (जि.ठाणे) महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती क्रमांक ३ मधील मौजे कामतघर येथील सर्व्हे नं. १०८/२, १०८/३, १०८/४, १७७/४ सदरील मालक धनाजी पटेल व लालजी राघवजी पटेल रावरीया, विकासक मे. एम.के. वाय इन्फ्रास्ट्रक्चरतर्फे भागीदार घनश्याम पटेल हे नियमबाह्य बांधकाम करीत असल्याबाबत आयुक्त, महानगरपालिका यांच्याकडे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जमीन मालक व विकासक यांना सन २०१३- १४ ला परवानगी दिली असताना सन २०१६ - १७ मध्ये अधिकारी व विकासक यांनी संगनमताने विकासकास ९ मजली इमारत बांधकामाची परवानगी दिली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, परवानगीतील अट क्र. १९ मध्ये १८ मी. रुंद विकास योजना रस्त्यावरील ११९ चौ. मी जागा नोंदणीकृत बंधपत्र क्र. ८२००/२०१३ दिनांक २० सप्टेंबर, २०१३ अन्वये ताबा पावतीद्वारे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेकडे हस्तांतरित करून महानगरपालिकेच्या भोगवाटदार यांचे नावे ७/१२ व फेरफार दाखल करून तो दोन महिन्याच्या आत महानगरपालिकेस सादर करणे आवश्यक असताना आजतागायत ७/१२ व फेरफार दाखल केलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अट क्र. २० नुसार खुली जागा (आर. जी) ही इमारत वापर दाखवण्यापूर्वी विकसित कारणे व ती कायम खुली करणे आवश्यक असताना तसेही झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अट क्र. २८ नुसार शहरातील वाढते प्रदूषण विचारात घेता विकसित भूखंडावर १०० चौ. मी क्षेत्रात ५ झाडे या प्रमाणे ६२२१ चौ. मी क्षेत्रात झाडे लावलेली व ते उद्यान विभागाचे प्रमाणपत्र दिलेले नसल्याने अशा प्रकारे परवानगीतील अटी व शर्तीचा भंग करीत असून त्यांच्यावर कारवाई होणे आवश्यक असताना महानगरपालिका अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी दोषी असणाऱ्या अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे. सदर निवेदन दिनांक १६.०७.२०१८ रोजी प्राप्त झाल्याचे आयुक्त, भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(२) सदर सर्वे नंबरबाबत भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेने खालीलप्रमाणे वस्तुस्थिती कळविली आहे:-

- दिनांक ०३.१०.२०१३ रोजी मौजे कामतघर येथील स.नं.१०८/२, ३, ४ व स.नं.१७७/४ या जागेमध्ये २ रहीवासी इमारतींना परवानगी देण्यात आली.
    - इमारत प्रकार-ए तळमजला (वाहनतळ) + पहिला मजला ते सहावा मजला + अंशत: सातवा मजला (रहिवास वापर).
    - इमारत प्रकार-बी तळमजला (वाहनतळ) + पहिला मजला ते सहावा मजला + अंशत: सातवा मजला (रहिवास वापर)
- परवानगीधारक यांनी हस्तांतरणीय विकास हक्क क्षेत्र वापरण्याचे प्रस्तावित केल्याने इमारत प्रकार-ए तळमजला (वाहनतळ) + पहिला मजला ते नववा मजला (रहिवास वापर) व इमारत प्रकार-बी तळमजला (वाहनतळ) + पहिला मजला ते नववा मजला (रहिवास वापर) या दोन इमारतींच्या बांधकामास अटी व शर्तीना अधिन राहून दिनांक ०३.०८.२०१६ अन्वये सुधारीत बांधकाम परवानगी देण्यात आली आहे.
- दिनांक २६.०३.२०१८ रोजी मौजे कामतघर येथील स.नं.१७७/५ मधील १२०० चौ.मी. क्षेत्राचा अंतर्भाव करून इमारत प्रकार-सी तळमजला (वाहनतळ) + पहिला मजला ते तिसरा मजला + अंशत: चौथा मजला (रहिवास वापर) या नवीन इमारतीसह या विकास प्रस्तावास सुधारीत परवानगी देण्यात आली.

(३) विकासकाने सदर १८ मी. रुंद रस्त्याकरीता एकूण ११९ चौ.मी. क्षेत्र नोंदणीकृत करारनाम्याद्वारे महानगरपालिकेच्या ताब्यात दिले असून आवश्यक फेरफार जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडील डिजीटाईल व ऑनलाईन प्रणालीतील तांत्रिक कारणांमुळे प्रलंबित आहे.

(४) अद्याप इमारत वापर सुरु नसुन सदर विकास प्रस्तावास वापर दाखला देण्यात आलेला नाही. वापर दाखला देण्यापुर्वी आवश्यक सर्व बाबी तपासण्यात येणार आहेत.

(५) विकासकाने विकसित भुखंडावर आवश्यक झाडे लावल्याची खात्री भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेने केली आहे.

(६) व (७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.